आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र – रात्री १.३० वाजता

२३ सप्टेंबर २०२३ – शनिवार

**ठळक बातम्या**

- सायबर दहशतवाद आणि आर्थिक गैरव्यवहार रोखण्यासाठी जागतिक स्तरावर विविध देशांच्या कायदे तज्ज्ञांनी एकत्र येण्याची गरज असल्याचं प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांचं मत

- जी-20 शिखर परिषदेच्या यशाचं श्रेय जी-20 संघाच्या सामूहिक प्रयत्नांना असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- 'वन नेशन वन इलेक्शन' समितीची पहिली बैठक आज नवी दिल्लीत संपन्न

- शाश्वत पद्धतींना चालना देण्यासाठी, 10 किनारी राज्यांतील 732 कृत्रिम भित्तिका केंद्रांना केंद्राची मंजुरी

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीच्या मन की बात या कार्यक्रमाद्वारे श्रोत्यांशी साधणार संवाद

**आणि**

- चीनमध्ये हांगझोऊ इथ आजपासून 19 व्या आशियाई क्रीडा स्पर्धेला सुरुवात

**<><><><><><><>**

सायबर दहशतवाद आणि आर्थिक गैरव्यवहार रोखण्यासाठी जागतिक कायदेशीर चौकट तयार करण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विधिज्ञांना केलं आहे. नवी दिल्ली इथं आज सकाळी दोन दिवसांच्या आंतरराष्ट्रीय वकील

परिषदेचं उद्घाटन करताना ते बोलत होते. सायबर दहशतवाद, आर्थिक गैरव्यवहार, कृत्रिम बुद्धिमत्तेचा गैरवापर या समस्यांना तोंड देण्यासाठी जागतिक चौकटीची गरज असून, हे एकट्या दुकट्या सरकारचं काम नसून, विविध देशांच्या कायदेतज्ज्ञांनी यासाठी एकत्र येणं आवश्यक आहे, असं ते म्हणाले. प्रधानमंत्री म्हणाले की, भारत अनेक ऐतिहासिक पावले उचलत असताना ही परिषद होत आहे. नारीशक्ती वंदन कायदा भारतातील महिलांच्या विकासाला नवी दिशा आणि नवी ऊर्जा देईल, असं त्यांनी सांगितलं.

स्वतंत्र भारताचा पाया मजबूत करण्यासाठी भारतीय कायदेतज्ज्ञांचा अनुभव कामी आला असं सांगून ते म्हणाले की, न्यायपालिका आणि विधीज्ञ हे वर्षानुवर्षे भारतीय न्यायव्यवस्थेचे संरक्षक राहिले आहेत आणि कोणत्याही देशाच्या जडणघडणीत कायदेतज्ज्ञांची भूमिका महत्त्वाची असते.

न्यायदान व्यवस्थेसमोरील उदयोन्मुख आव्हाने ही या परिषदेची संकल्पना आहे. बार कौन्सिल ऑफ इंडियातर्फे प्रथमच या परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या विविध कायदेविषयक मुद्द्यांवर अर्थपूर्ण संवाद आणि चर्चेसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणं हा या परिषदेचा उद्देश आहे.

**<><><><><><><>**

पाकिस्तान संयुक्त राष्ट्रांच्या व्यासपीठाचा दुरुपयोग करत असल्याचं भारतानं आज संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत स्पष्टपणे म्हटलं आहे.

दहशतवादाच्या विरोधात पाकिस्ताननं कारवाई करावी अशी मागणी ही भारतानं केली आहे. पाकिस्तानला भारतातील घडामोडींवर बोलण्याचा कोणताही अधिकार नाही, असं भारतानं म्हटलं आहे. जम्मू-काश्मीर आणि लडाखशी संबंधित मुद्दे ही भारताची पूर्णपणे अंतर्गत बाब असल्याचं भारतानं स्पष्ट केलं आणि

मानवाधिकारांबाबत आपल्या निराशाजनक कामगिरीमुळे पाकिस्तान आंतरराष्ट्रीय समुदायाची दिशाभूल करत असल्याची टीका केली आहे.

<><><><><><>

पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या आधी जनता दल धर्मनिरपेक्ष पक्ष, राष्ट्रीय लोकशाही आघाडी-एनडीए मध्ये सहभागी झाला आहे. या पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री एचडी कुमार स्वामी यांनी काल नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा यांच्यासोबत चर्चा करून ही घोषणा केली. जनता दल धर्मनिरपेक्ष पक्ष, राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्ये सहभागी झाल्याबद्दल नड्डा यांनी आनंद व्यक्त केला आहे. यामुळे राष्ट्रीय लोकशाही आघाडी मजबूत होईल आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या शक्तीशाली भारताच्या संकल्पाला सुद्धा बळ मिळेल, असं नड्डा यांनी समाज माध्यमावरील आपल्या टिप्पणीत म्हटलं आहे.

<><><><><><>

जी-20 शिखर परिषदेच्या यशाचं श्रेय ही परिषद व्यवस्थित पद्धतीनं चालू राहावी यासाठी काम करणाऱ्या जी-20च्या संघाला असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत काल भारत मंडपममध्ये जी-20 परिषदेच्या आयोजनात सहभागी अधिकाऱ्यांबरोबर ते संवाद साधत होते. या अधिकाऱ्यांनी त्यांचे अनुभव शब्दबद्ध करावेत ज्यामुळे भविष्यातल्या आयोजनासाठी ते दिशादर्शक होईल, अशी सूचना त्यांनी केली.

जी-20चं यश म्हणजे जगभरात लिहिली गेलेली संपादकीयं नसून, जगभरात भारताविषयी तयार झालेला विश्वास आहे, असं त्यांनी नमूद केलं. दिल्लीत 2010 मध्ये झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत अनेक गोष्टींमुळे भारताविषयी अनादर निर्माण

झाल्याची आठवण त्यांनी करून दिली आणि देशाचं ब्रँडिंग करण्याची संधी गमावण्यात आली, असं त्यांनी सांगितलं.

जागतिक पातळीवरच्या संकटांमध्ये मदतींमध्ये भारतानं दिलेल्या योगदानामुळे भारताचा विश्वास वाढलाय, असं सांगून त्यांनी नेपाळ आणि तुर्कीयेतील भूकंप, फिजीतील चक्रीवादळ, मालदीवमधील पाणी संकट, श्रीलंकेतील आर्थिक पेच आणि येमेनमधील संकट अशी उदाहरणं दिली. अशा विविध पेचांमध्ये भारताकडून दिल्या जाणाऱ्या मदतीमुळे भारत बलवान आहे आणि गरज असलेल्या सर्वांपर्यंत मदतीचा हात पुढे करत आहे, अशी धारणा तयार होत आहे, असं त्यांनी सांगितलं.

<><><><><><><>

नागपूर आणि परिसरात काल रात्री दोन वाजता सुरू झालेल्या संततधार पावसामुळे शहराच्या सखल भागामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचलं आहे. केवळ चार तासांत १०० मिलीमीटर पावसाची नोंद झाली अंबाझरी तलाव ओसंडून वाहत असून जिल्हा आणि महानगर प्रशासनाचा आपत्ती व्यवस्थापन चमू कार्यरत आहे. आज सकाळीच जिल्हाधिकारी आणि महानगर पालिका आयुक्तांनी शहरातल्या अनेक भागांची पाहणी केली. शहरासह जिल्ह्यातील परिस्थितीवर आपत्ती व्यवस्थापन विभाग लक्ष ठेवून आहे.

जिल्ह्यातल्या सर्व शाळांना जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी आज सुट्टी जाहीर केली आहे. सखल भागात अडकलेल्या नागरिकांना तातडीनं मदत करण्याच्या सूचना राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. तातडीने बचाव कार्य सुरू करण्यासाठी एनडीआरएफ अर्थात राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाचा एक आणि राज्य आपत्ती निवारण दलाचे दोन चमू शहरात

बचाव कार्यासाठी तैनात करण्यात आल्या आहेत. दरम्यान, महानगरपालिकेकडून हेल्पलाईन नंबर जारी करण्यात आले आहे. भंडारा, गोंदिया जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात शेती पाण्याखाली गेली असून, अनेक रस्ते पाणी साचून बंद झाले आहेत. वैनगंगा नदी धोक्याच्या पातळीवरून वाहत असल्यामुळे गोसीखुर्द धरणाचे सर्व ३३ दरवाजे उघडण्यात आले आहेत.

**<><><><><><>**

एक देश एक निवडणूक समितीची पहिली बैठक आज नवी दिल्लीत झाली. केंद्र सरकारने माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली  आठ सदस्यांची समिती 2 सप्टेंबर रोजी अधिसूचित केली होती लोकसभा आणि विविध राज्यांच्या विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेण्याबाबत चाचपणी करण्यासाठी या समितीची स्थापना करण्यात आली आहे. देशाची राज्यघटना आणि इतर संवैधानिक तरतुदींच्या आधारावर ही समिती आपल्या शिफारसी सादर करेल.

याबाबत राज्यघटनेत केलेल्या सुधारणांना राज्यांचीही मंजुरी आवश्यक आहे का याचा अभ्यास ही समिती करेल.

**<><><><><><>**

शाश्वत पद्धतींना चालना देण्यासाठी, केंद्रीय मत्स्यव्यवसाय विभागानं १० किनारी राज्यांसाठी एकूण १२६ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह ७३२ कृत्रिम भित्तिका केंद्र मंजूर केली आहेत. या केंद्राद्वारे प्रायोजित प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेचा उप कृती कार्यक्रम असलेल्या “एकात्मिक आधुनिक किनारी मासेमारी गावांतर्गत या केंद्रांना मंजूरी दिली आहे.

भारतीय मत्स्य सर्वेक्षण,  भारतीय कृषी संशोधन परिषद आणि केंद्रीय सागरी मत्स्य संशोधन संस्था यांच्या तांत्रिक सहाय्यानं हा प्रकल्प राबवला जाणार आहे.

सर्व राज्यांनी त्यांच्या जागासंबंधी निवड प्रक्रिया पूर्ण केली आहे  हे सर्व प्रकल्प जानेवारी २०२४ पर्यंत पूर्ण होणं अपेक्षित आहे.

**<><><><><><>**

दक्षिणी जगताबरोबरच भारतामधील विकास प्रकल्पांचे एकूण मूल्य आता चाळीस अब्ज डॉलर्सहून अधिक झाल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयातील पश्चिम विभागाचे सचिव संजय वर्मा यांनी दिली. शांतता निर्माण आयोगाच्या काल न्यूयॉर्कमध्ये झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

दक्षिणी जगतातील देशांत विकास कार्याबरोबरच शांतता स्थापन करण्यासाठी भारत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचंही वर्मा यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><><>**

गोव्याची राजधानी पणजी इथल्या अग्वादा किल्ल्यात आज  भारतातल्या पहिल्या दीपगृह महोत्सवाला सुरुवात होत आहे.केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी, जलमार्ग आणि आयुष मंत्री सर्वानंद सोनवाल यांच्या हस्ते महोत्सवाचं उद्घाटन होणार असून, हा महोत्सव तीन दिवस चालणार आहे. समुद्रकिनाऱ्यावरील दीपगृहं पर्यटकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरावीत आणि स्थानिकांना उत्पन्नाचा स्रोत निर्माण व्हावा, हा या महोत्सवाचा उद्देश आहे.

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीच्या मन की बात या कार्यक्रमाद्वारे श्रोत्यांशी संवाद साधतील. प्रधानमंत्र्यांचा आकाशवाणी कार्यक्रमाचा  हा १०५ वा भाग आहे. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या संपूर्ण नेटवर्कवर, आकाशवाणी संकेतस्थळ आणि न्यूज ऑन एआयआर मोबाइल ॲपवर प्रसारित केला जाईल. आकाशवाणी, डीडी न्यूज, पीएमओ आणि माहिती

आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनेलवरही  हा कार्यक्रम  थेट प्रक्षेपित केला जाईल. हिंदी प्रसारणानंतर लगेचच आकाशवाणी हा कार्यक्रम प्रादेशिक भाषांमध्ये प्रसारित करेल.

<><><><><><><>

चीनमध्ये हांगझोऊ इथे आजपासून 19 व्या आशियाई क्रीडा स्पर्धेला अर्थात एशियाडला सुरुवात होणार आहे.  या खेळांचा भव्य उद्घाटन सोहळा आज संध्याकाळी हँगझोऊ ऑलिम्पिक स्पोर्ट्स स्टेडियमवर बिग लोटस नावानं होणार आहे.  पुरुष हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग आणि महिला मुष्टियोद्धी लोव्हलिना बुरगोहेन उद्घाटन संचलनात राष्ट्रध्वज घेऊन भारतीय तुकडीचं नेतृत्व करतील या स्पर्धेत 45 देशांतील खेळाडू 40 क्रीडाप्रकारांमधील 61 स्पर्धांमध्ये आपलं कौशल्य दाखवतील.

भारतानं 655 खेळाडू, 260 प्रशिक्षक आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांसह एकूण 921 सदस्यांची मोठी तुकडी पाठवली आहे. भारतीय खेळाडू 40 स्पर्धांमध्ये सहभागी होणार आहेत. आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचा हा आतापर्यंतचा सर्वात मोठा संघ आहे.

आशियाई क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्याचे थेट प्रक्षेपण भारतीय वेळेनुसार संध्याकाळी 5:30 वाजता सुरु होणार आहे.

//<><><><><><><>//